MS 2022-2023

यशवंतराव चव्हाण

जीवन व कार्य



संपादक
प्रा. डॉ. शरद जा. वाघोळे
प्रा. डॉ. प्रमोद दा. देवके

ईगल लीप प्रकाशन, पुणे

यशवंतराव चव्हाण यांचे कृषी विषयक विचार

डॉ. गजानन संतोषराव कुबडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वाशिम, जि. वाशिम मो.क्र. ९९२१५४४९६२
ई.मेल : gskubade@gmail.com

[illegible]दिवस शेती आणि शेतीसंबंधीचे प्रश्न अधिक गंभीर होत चाललेले [illegible]ल्या दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासून दिल्ली येथे केंद्र शासनाने [illegible]लेल्या शेती कायद्यांविषयी शेतकऱ्यांचे ऐतिहासिक आंदोलन चालू आहे. [illegible]वर सरकार किती गंभीर आहे? हे सर्व जग उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. [illegible] पार्श्वभूमीवर शेती आणि शेती व्यवसायाकडे एक राजकीय नेता म्हणून [illegible]तराव चव्हाण कसे बघत होते. त्यांचा शेतीविषयक काय दृष्टिकोन होता, हे [illegible] औसुक्याचे ठरेल.

[illegible]व चव्हाण यांचे कृषी विषयक विचार :

'सर्वांगीण विकास' हा यशवंतराव यांचा परवलीचा शब्द होता. एका क्षेत्रामध्ये [illegible]ती झाली म्हणजे विकास होतो असे ते मानत नसत. सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती म्हणजे [illegible]कास अशी विकासाची ते व्याख्या करत. शेतीचा प्रश्न हा या देशातील मूलभूत [illegible] प्रश्न आहे आणि तो सर्व जगालाही भेडसावतो आहे. इतर क्षेत्रातील उत्पादन [illegible] शेतीमधील उत्पादन या मध्ये मूलभूत असा फरक आहे. औद्योगिक क्षेत्रातील [illegible]न्न हे केंद्रभूत स्वरूपाचे तर, शेतीचे उत्पादन हे विकेंद्रित स्वरूपाचे [illegible]ल्यामुळे त्यांच्या उत्पादनाच्या आघाडीवर सतत लढाई चालू ठेवावी लागते.

कोणत्याही प्रश्नांचा विचार करताना यशवंतराव अतिशय गांभीर्यपूर्वक आणि

दूरदृष्टीने विचार करत असत. शेतीच्या प्रश्नांविषयी ते म्हणत असत की, शेतीचा हा रावणासारखा आहे. राम आणि रावणाच्या कथेतील रावण हा दहा तोंडाचा ह तर, आमच्या शेतीचा प्रश्न हा शंभर तोंडाचा आहे. जेथे पाहावे तेथे त्याला आहे. शेतीची रचना कशी असावी, शेतीची धारणा कशी असावी, शेतीमध्ये अवजारांचा उपयोग करावयाचा आहे त्याचे स्वरूप कसे असावे, शेतीला लाग भांडवल कोणत्या पद्धतीने घ्यावे, शेतीचा उपयोग कोणत्या कामासाठी करा शेतीवर आधारलेल्या धंद्यांचा उपयोग कसा करावा, त्याची बाजारपेठ कशी हस्त करावी असे शेती संबंधीचे हजारो प्रश्न आहेत, असे त्यांचे मत होते.

शेतीचे महत्व अधोरेखित करताना ते म्हणतात, कोणत्याही राष्ट्राने किती प्रगती केली तरी शेवटी त्याचे पाय जमिनीवरच असतात. चंद्रावर जाण्याचा प्रय करावयाचा असला तरीही त्याच्यासाठी जमिनीवर जर पाय नसतील तर, चंद्राव जाण्याचा विचार करणे सुचणार नाही. चंद्रावर जाणारे रॉकेट कसे तयार करावे या विचार शास्त्रज्ञाच्या डोक्यात चालवायचा असेल तर, त्याच्या पोटामध्ये प्र अन्नाचा कण गेला पाहिजे. त्याशिवाय ते काम त्याला जमणार नाही. त्यासु कितीही मोठे प्रयत्न करायचे एखाद्या देशाने ठरवले तरी, जमिनीतून निर्म होणाऱ्या उत्पादनावरच शेवटी माणूस अवलंबून असतो.

शेती आणि शिक्षणाचा, प्रशिक्षणाचा संबंध आम्ही तोडून टाकलेला आ शेतकऱ्याला शिक्षणाची नितांत गरज आहे असे आजही आपण मानत ना आमची कृषी विद्यापीठे शेतकऱ्याच्या बांधावर जायला कमी पडतात याच फेरविचार करण्याची वेळ आली आहे. शेतकरी आणि शेती संबंधित असण मनुष्य हा शहाणा झाल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही असे त्यांचे मत होते.

कोणतेही शास्त्र स्थिर नाही त्यात काळानुसार बदल होत असतात. जगात ज्ञान वाढते आहे या वाढत्या ज्ञानाचा परिणाम शेतीच्या ज्ञानावर आणि विज्ञान होत आहे. म्हणून शास्त्रीय ज्ञानाची गरज इतर क्षेत्राबरोबरच शेतीला अधिक आ पारंपरिक पद्धतीने शेती करण्याचे दिवस कधीच संपलेले आहेत या देशात जास्तीत जास्त लोकांना शेतीमध्येच काम करावयाचे आहे. दोन एकरात शेत काम करणारा शेतकरी आपल्या कामामध्ये पराभूत झाला तर, तो देशाचा पर होतो असे त्यांचे मत होते.

शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा आहे, हे ओळखून यशवंतराव चव्ह शेतीविषयक विचार मांडत. विचाराच्या दिशेने विकासात्मक पावले टाकत. त्या एकेकाळी अन्न धान्याचा तुटवडा पडलेल्या महाराष्ट्रात हरितक्रांती निर्माण झा

भारत हा शेतीप्रधान देश आहे. या देशातील ७० टक्के जनता जर शेतीवर अवलंबून असेल, तर शेतीकडे तितक्या गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते.

शेतीच्या विकासासंबंधी त्यांची विचारप्रणाली आधुनिक स्वरुपाची होती. पारंपारिक शेती करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेती करावी, शेतीतून कच्च्या मालाचे भरपूर उत्पादन झाले पाहिजे, या कच्च्या मालाचे रुपांतर करणारे उद्योगधंदे देशात निघाले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. शेतीच्या विकासासंबंधी विचार व्यक्त करताना ते म्हणतात, शेतीच्या विकासाची स्थूलमानाने दोन अंगे आहेत. एक म्हणजे शेतीच्या म्हणजे पर्यायाने पीक लागवडीच्या पध्दतींची सुधारणा व दुसरे म्हणजे जमीनविषयक सुधारणा. पहिले अंग तांत्रिक स्वरुपाचे तर दुसऱ्याचे स्वरुप जसे आर्थिक तसे सामाजिकही आहे. आपल्याकडे शेतकी संशोधन मुख्यतः शासनाच्या पातळीवरच होत आहे. पण संशोधन निष्कर्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याची यंत्रणा सध्यापेक्षा पुष्कळच अधिक व्यापक व कार्यक्षम झाली पाहिजे. हे त्यंचे मत विचारपणव आहे.

प्रयोगशाळेतील ज्ञान शेतकऱ्यापर्यत पोहोचले पाहिजे. कृषी संशोधन शेतकऱ्यापर्यंत न पोहचल्यामुळे तो पारंपारिक पध्दतीनेच शेती करत आहे. त्यामुळे कृषीक्षेत्रात झपाटयाने प्रगती झाली नाही शेतीच्या लागवडीत सुधारलेल्या बियांण्यांचा वापर, सुधारलेल्या अवजारांचा वापर आणि मशागतीच्या सुव्यवस्थित व शास्त्रीय पध्दतींचा अवलंब या तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. याविषयी शेतकऱ्यामध्ये जाणीव जागृती व्हाचे असे यशवंतरावांना वाटते.

यशवंतरावांचे मार्गदर्शक तत्व :

शेती ही निसर्गावर आधारित आहे. ती पावसातील जुगार आहे. हा विचार यशवंतरावांना मान्य नाही. निष्चयाचे बळ असेल तर डोंगरसुध्दा हलविता येतील. या उक्तीप्रमाणे वागून जमिनीला बांधताली घालावी, असे ते म्हणतात. पाणीपुरवठयाची कमतरता ही महाराष्ट्रातील शेतीची समस्या आहे. महाराष्ट्रातील शेतीची समस्या आहे. महाराष्ट्रातील लागवडीयोग्य जमिनीपैकी पाच ते सहा टक्के जमिनी पाणीपुरवठयाची सोय आहे. पाणीपुरवठयाच्या सर्व योजना अमंलात आणल्यावर २० टक्के जमिनीस पाणीपुरवठा होईल. त्यामुळे बांध-बंदिस्ती, जमीनसंरक्षणाचे उपाय व कारेडवाहू पध्दतीची शेती यांचा अवलंब करुन उरलेल्या ८० टक्के जमिनीचा पाणी पुरवठयाचा प्रश्न सुटू शकेल. यासाठी ते काही मार्गदर्शक तत्वे मांडतात. ती पुढीलप्रमाणे

१. आवश्यक तेथे पाटबंधारे बांधून पाणीपुरवठा उपलब्ध करुन देणे.
२. बांध –बंदिस्तीची आणि भूसरंक्षाणाची कामे मोठया प्रमाणात सुरु करावीत.
३.सुधारित बी–बियाणे,रासायनिक खते,आधुनिक तंत्रज्ञान शेतकद्दयापर्यंत पोहचविणे
४. शेतीच्या संशोधनाचे निष्कर्ष थेट शेतकद्दयापर्यंत पोहचविणे.

शेतीमध्ये आमुलाग्र बदल होण्यासाठी आणि शेतकद्दयांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे शिफारशी सुचविल्या आहेत.

१. सहकारी शेती अस्तित्वात आणणे.
२. सेवा सहकारी सोसायटया स्थापन करणे.
३. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील दोष दूर करणे.
४. कृषि उद्योगांचा विकास करणे
५. व्यापारी तत्वावर शेती करणे.
६. हुशार व कर्तबगार माणसे शेतीत काम करण्यासाठी तयार असावीत

वरील शिफारर्शीपैकी काही शिफारशी प्रत्यक्ष कृषी क्षेत्रात अंमलात आणल्या गेल्या. त्याचे दूरगामी परिणामही झाले. पण यशवंतराव मुख्यमंत्री पदावरुन लवकरच संरक्षणमंत्री पदावर गेले. अन्यथा कृषी क्षेत्रात अजुनही आमुलाग्र बदल झाले असते. पण कृषि–औद्योगिक क्षेत्राची प्रगती व्हावी, गरीब आणि श्रीमंत शेतकरी ही दरी कमी व्हावी, शेतीचा विकास म्हणजे देशाचा विकास होय. असे त्यांनी मांडलेले विचार आणि केलेल्या उपाययोजना दिशादर्शक आहेत.

सारांश :

शेतीसंबंधीचा नवा दृष्टिकोन, शास्त्रीय दृष्टिकोन हा मर्यादित राहता कामा नये. पाच पंधरा कापड गिरण्या काम करू लागल्या की, काही कोटी लोकांना कापड मिळते, पण पाच-पंचवीस ठिकाणीच शेतीचे चांगले उत्पादन काढण्याचा प्रयोग केला तर, त्यामुळे शेतीचे एकंदरीत उत्पादन वाढण्याचा काही संबंध नाही. दहा पाच कृषीपंडित निघाले तर, त्यांचा वैयक्तिक मोठेपणा वाढेल पण त्यांची शेती करण्याची पद्धत हजारो शेतकऱ्यांपर्यंत पाझरत गेली नाही तर, त्यांच्या ज्ञानाचा काही उपयोग नाही. म्हणून शेतीचे ज्ञान पावसाच्या पाण्यासारखे सर्वत्र गेले पाहिजे. वाहणारी नदी ज्या गावच्या काठाने जाते त्या त्या गावालाच फक्त पाणी मिळते पण पावसाचे पाणी हे सगळीकडे जाते म्हणून पावसाच्या पाण्यासारखे शेतीचे ज्ञान सगळीकडे पसरले पाहिजे, वाढले पाहिजे आणि विविध महाविद्यालयात त्याची केंद्रे झाली पाहिजेत असा आणि एवढा व्यापक विचार ते करीत असत. असा विचार आज आपण केला तर शेतीच्या सर्वांगीण विकासाला प्रेरणा मिळेल.

संदर्भ ग्रंथ :

* भोळे भा.ल. (२००४), यशवंतराव चव्हाणः राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* वाघमारे जे.एम. (१९८६), मा. यशवंतराव चव्हाण- एक स्मरण, संपादकः कुलकर्णी जी.व्ही., कराड, यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय.
* चव्हाण यशवंतराव (१९८७), कृष्णाकाठ, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे.
* काळे बाबुराव (१९५९), यशवंतराव चव्हाण, रेगे प्रकाशन, पुणे.
* केळकर भा.कृ.: यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्व, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ.

* * *